RNI No. MAHBIL/2009/36619

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ५, अंक २९]    शुक्रवार, जुलै ५, २०१९/आषाढ १४, शके १९४१    [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ५१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नेमणुका**

**जिल्हाधिकारी, पालघर यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक गृह/का.१/टे.४/विकाअ/वशी-१३१०/२०१९.—जिल्हाधिकारी पालघर, जिल्हा पालघर ह्या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पालघर जिल्ह्यातील २७ व्यक्तींची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. ही नियुक्ती सामान्यतः आदेश निर्गमित केल्याच्या तारखेपासून ५ वर्षांकरिता अथवा पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत अस्तित्वात राहील. तसेच जिल्हाधिकारी, पालघर यांस विशेष कार्यकारी अधिकारी यांची ही नियुक्ती वरील कालावधी पूर्ण होण्यापूर्वी केव्हाही, कोणतेही कारण न देता संपुष्टात आणण्याचा अधिकार राहील.

१. **विशेष कार्यकारी अधिकारी पुढे उल्लेख केलेली कर्तव्ये पार पाडण्यास सक्षम राहतील :—**

(एक) विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती " मानसेवी " असल्यामुळे विशेष कार्यकारी अधिकारी यांना कोणतेही मानधन/ वेतन/भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

(दोन) विशेष कार्यकारी अधिकारी यांना केवळ कागदपत्रांच्या साक्षांकनाचे अधिकार राहतील व त्यांनी मुळ कागदपत्रे प्रत्यक्ष पाहिल्या शिवाय साक्षांकन करू नये. त्यांनी साक्षांकन करताना विहीत रबरी शिक्क्यासह सही करून सहीखाली दिनांक नमूद करावा. मूळ कागदपत्रांपेक्षा वेगळी माहिती नमूद असलेल्या कागदपत्रांवर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकन करू नये. वेगळी माहिती असलेल्या कागदपत्रांवर जर " सत्यप्रत " म्हणून साक्षांकन केल्यास त्यामुळे होणाऱ्या सर्व प्रकारच्या परिणामाकरिता " विशेष कार्यकारी अधिकारी " म्हणून साक्षांकन करणारी व्यक्ती जबाबदार राहील. अशी घटना उघडकीस आल्यास त्या व्यक्तीची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून करण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल. व तो/ती विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून पुनर्नियुक्तीस अपात्र असेल.

(तीन) विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तींनी त्यांच्या घरावर/दुकानावर/कार्यालयावर स्वतःच्या नावासह " विशेष कार्यकारी अधिकारी " असा फलक लावावा. तथापि, त्यांनी त्यांच्या कुठल्याही वाहनावर " विशेष कार्यकारी अधिकारी " असा उल्लेख करू नये. तसेच त्यांच्या नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यावर लागलीच त्यांनी सदर फलक काढावेत.

(चार) विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तींनी " ओळख परेड " तसेच " मृत्यूपूर्व जबानी " यासाठी उपस्थित राहू नये.

(पाच) विशेष कार्यकारी अधिकारी यांनी " उत्पन्नाचे प्रमाणपत्र " देवू नये.

(सहा) नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकनाचे काम करू नये व सर्व साहित्य संबंधित तहसीलदार यांचेकडे तात्काळ परत करावे, अन्यथा ते पुनर्नियुक्तीस अपात्र ठरतील. नियुक्ती कालावधी संपृष्टात आल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकारी याने साक्षांकन केल्याचे निष्पन्न झाल्यास त्यांच्या विरुद्ध फसवणूकीचा गुन्हा नोंदविण्यात येईल.

(सात) विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती ही नियुक्तीच्या दिनांकापासून ५ वर्षे कालावधीसाठी राहील व त्यानंतर ती आपोआप संपुष्टात येईल. सदर नियुक्तीच्या कालावधीत त्यांनी कोणतीही नियमबाह्य कृती केल्यास किंवा त्यांचे विरुद्ध गुन्ह्याची नोंद आढळल्यास, त्यांना कोणत्याही न्यायालयाने नादार (bankrupt) जाहीर केले असल्यास, त्याचप्रमाणे कोणत्याही कारणाशिवाय सुद्धा, कोणतीही पुर्वसुचना न देता त्यांची नियुक्ती मुदतपुर्व रद्द करण्यात येईल.

**अनुसूची**

| अ.क्र. (१) | तालुका (२) | व्यक्तीचे नाव (३) | पत्ता (४) |
|---|---|---|---|
| १ | वसई | श्री. राहुल तुकाराम कटके | रा. के. २०१, भाग्यश्री बिल्डिंग, राज नगर, आचोळे, नालासोपारा, ता. वसई, जि. पालघर. |
| २ | वसई | श्री. रंजित ईश्वरदयाल सिंह | रा. सी/१०२, शिवम बिल्डिंग, सेक्टर-५, वसंत नगरी, ता. वसई, जि. पालघर. |
| ३ | वसई | श्रीम. संध्या ईश्वरदयाल सिंह | रा. सी/१०२, शिवम बिल्डिंग, सेक्टर-५, वसंत नगरी, ता. वसई, जि. पालघर. |
| ४ | वसई | श्रीम. शैला विजय बेर्डे | रा. सी/४०३, दामोदर पार्क, तुळींज रोड, नालासोपारा (पू.), ता. वसई, जि. पालघर. |
| ५ | वसई | श्रीम. रत्नप्रभा रविकांत सुर्वे | रा. १०२/ बी, छाया अपार्टमेंट, अमी पार्क, नालासोपारा (प.), ता. वसई, जि. पालघर. |
| ६ | वसई | श्री. शिबु नारायनन नायर | रा. प्रणव बंगलो, कारगील रेसीडन्सी, स्टेला पेट्रोलपंप मागे, वसई (प.), ता. वसई, जि. पालघर. |
| ७ | वसई | श्रीम. निता हर्षद वझे | मु. पो. अर्नाळा, सोसायटी स्टॉप, पेचकर वाडी, ता. वसई, जि. पालघर. |
| ८ | वसई | श्री. निलेश मधुकर मिसाळ | रा. रुम नं. १०७, शिवओम अपार्टमेंट, चंदनसार रोड, केशवनगर, विरार (पू.), ता. वसई, जि. पालघर. |
| ९ | वसई | श्री. विरारकर कुंदन मधुकर | रा. १४, साईबा हाऊस, हनुमान रोड, कामण, ता. वसई, जि. पालघर. |
| १० | वसई | श्री. प्रेमकुमार वडक्केवीड्ड रामनकुट्टी | रा. ३/२०४, छेडा इन्केल्व, मातृज्योत सीएचएस, पांचाळनगर, नालासोपारा, ता. वसई, जि. पालघर. |
| ११ | वसई | श्री. सचिन व्यंकट पवार | रा. ए/२०१, प्रतिक पॅलेस, पाटणकर पार्क रोड, नालासोपारा, ता. वसई, जि. पालघर. |
| १२ | वसई | श्री. सतीश अर्जुन भोंडवे | रा. ए-०१, वाप्टीस्ट स्मृती, पाटणकर पार्क रोड, नालासोपारा, ता. वसई, जि. पालघर. |
| १३ | विक्रमगड | श्री. भानुशाली राहूल विजय | रा. साखरे, ता. विक्रमगड, जि.पालघर |
| १४ | विक्रमगड | श्री. रुपेश मधुकर वनमाळी | रा. साखरे, ता. विक्रमगड, जि. पालघर |
| १५ | विक्रमगड | श्री. संदिप बाबुराव पाटील | रा. विक्रमगड (पाटीलपाडा), ता. विक्रमगड, जि. पालघर |
| १६ | विक्रमगड | श्रीम. वर्षा उदय बोडके | रा. आलोंडे, ता. विक्रमगड, जि. पालघर |
| १७ | विक्रमगड | श्री. विजय दत्तात्रेय भंडागे | रा. मु. पो. विक्रमगड, ता. विक्रमगड, जि. पालघर |
| १८ | विक्रमगड | श्री. ओमकार विठ्ठल पोटे | रा. आलोंडे, ता. विक्रमगड, जि. पालघर |
| १९ | विक्रमगड | श्री. महेश वसंत आळशी | मु. पो. ता. विक्रमगड, जि. पालघर |
| २० | विक्रमगड | श्री. मनोज वसंत आळशी | मु. पो. ता. विक्रमगड, जि. पालघर |

**अनुसूची** (समाप्त)

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २१ | विक्रमगड | श्री. निशीकांत नंदकुमार संखे | मु. पो. ता. विक्रमगड, जि. पालघर |
| २२ | विक्रमगड | श्री. अशोक गणपती निकम | मु. पो. ता. विक्रमगड, जि. पालघर |
| २३ | पालघर | श्रीम. तृप्ती राजन मेस्त्री | मु. पो. शिरगाव, ता. जि. पालघर |
| २४ | पालघर | श्री. नागेश मनोहर जाधव | रा. दहिसर तर्फे मनोर, ता. जि. पालघर |
| २५ | तलासरी | श्री. नविन धाकल वाढिया | रा.वसा, ता. तलासरी, जि. पालघर |
| २६ | तलासरी | श्री. महेंद्र मनोज गोवारी | रा. सुत्रकार-काकडपाडा, ता. तलासरी, जि.पालघर |
| २७ | तलासरी | श्री. सायमन अर्जुन बोबा | रा. कुर्झे, बोबापाडा, ता. तलासरी, जि. पालघर |

पालघर,
दिनांक ४ जुलै २०१९.

**डॉ. प्रशांत नारनवरे,**
जिल्हाधिकारी, पालघर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.